अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शनिवार
१४.११.२०२६

वरुड
दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २८४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

ऐन दुष्काळी परिस्थितीत मोर्शी नगरपरिषद इमारतीच्या छतावर रंगली चक्क 'ओली पार्टी'

अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पार्टीचा ड्रोन व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

शासकीय कार्यालयाच्या वापराबाबत उपस्थित झाले गंभीर प्रश्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी - अमरावती जिल्ह्यातील मोर्शी नगरपरिषद पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली असून, नगरपरिषद इमारतीच्या छतावर रात्रीच्या सुमारास कथित ओली पार्टी रंगल्याचा प्रकार समोर आल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

या कथित पार्टीचा ड्रोनद्वारे चित्रित करण्यात आलेला व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, या प्रकारामुळे नगरपरिषदेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

एकीकडे अमरावती जिल्ह्यासह मोर्शी तालुक्यात दुष्काळी परिस्थितीचे सावट गडद होत असताना दुसरीकडे सर्वसामान्य नागरिक पाण्याच्या समस्येने त्रस्त आहेत. शेतकरी आपल्या पिकांना आणि संत्रा बागांना वाचविण्यासाठी धडपड करीत आहेत. अशा गंभीर परिस्थितीत नागरिकांच्या समस्या सोडविण्याची जबाबदारी असलेल्या नगरपरिषद इमारतीच्या छतावर रात्रीच्या वेळी कथित पार्टी झाल्याची चर्चा रंगू लागल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या ड्रोन व्हिडिओमध्ये नगरपरिषद इमारतीच्या छतावर काही व्यक्ती एकत्र जमल्याचे दिसत असल्याचा दावा केला जात आहे. या ठिकाणी नगरपरिषदेतील काही अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित असल्याची चर्चा असून, त्यांच्याकडून पार्टीचे आयोजन करण्यात आल्याचेही बोलले जात आहे.

मात्र, व्हिडिओतील व्यक्तींची ओळख, पार्टीचे नेमके स्वरूप आणि त्यामध्ये कोण अधिकारी अथवा कर्मचारी सहभागी होते, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

शासकीय इमारतीचा वापर नेमका कोणाच्या परवानगीने?

शासकीय कार्यालय हे जनतेच्या करातून उभे राहिलेले सार्वजनिक ठिकाण आहे. अशा कार्यालयाच्या इमारतीचा वापर खासगी कार्यक्रमासाठी किंवा रात्रीच्या वेळी मनोरंजनासाठी करण्यात आला असल्यास त्याची परवानगी कोणी दिली, याची चौकशी होणे आवश्यक आहे. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर इमारतीच्या छतावर कोणाला प्रवेश देण्यात आला? सुरक्षेची जबाबदारी कोणाची होती? या कार्यक्रमासाठी शासकीय जागेचा वापर करण्यात आला असल्यास त्यासंबंधी अधिकृत परवानगी घेण्यात आली होती काय? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

चौकशी होऊन सत्य बाहेर येणार का?

दरम्यान, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडिओची सत्यता तपासणे गरजेचे असून, संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या व्यक्तींची ओळख पटवून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका तपासावी. तसेच शासकीय इमारतीचा वापर कोणत्या उद्देशाने करण्यात आला, याचीही सखोल चौकशी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दुष्काळात नागरिकांचे प्रश्न महत्त्वाचे की पार्टीची चर्चा?

मोर्शी तालुका हा प्रामुख्याने शेती आणि संत्रा उत्पादकांचा परिसर म्हणून ओळखला जातो. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. पाणीटंचाई, शेतीच्या समस्या आणि नागरी सुविधांच्या प्रश्नांमुळे नागरिक प्रशासनाकडे अपेक्षेने पाहत आहेत. अशा वेळी नगरपरिषदेसारख्या महत्त्वाच्या शासकीय संस्थेच्या इमारतीवर कथित ओली पार्टी झाल्याची बातमी समोर येणे ही निश्चितच गंभीर बाब मानली जात आहे.

पुणे-नागपूर ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात : पुलाच्या कठड्याला धडकून बस नाल्यात, प्रवाशांना काचा फोडून बाहेर काढलं, एकाचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



छत्रपती संभाजीनगर- पुण्याहून नागपूरकडे जाणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसचा शनिवारी (दि.१४) पहाटे भीषण अपघात झाला. छत्रपती संभाजीनगर-जालना महामार्गावर धावणाऱ्या या बसने पुलाच्या कठड्याला धडक दिली आणि थेट २० फूट खोल नाल्यात कोसळली. या अपघातात २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून, अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. त्यापैकी एका प्रवाशाची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच चिकलठाणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. बसच्या काचा फोडून आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं.

पुलाच्या कठड्याला धडक अन बस नाल्यात कोसळली समोर आलेल्या माहितीनुसार, पुण्याहून नागपूरच्या दिशेने जाणारी खासगी स्लीपर ट्रॅव्हल्स शनिवारी पहाटे छत्रपती संभाजीनगर-जालना महामार्गावरून जात होती. यावेळी बसने पुलाच्या कठड्याला धडक दिली. या धडकेनंतर बस थेट सुमारे २० फूट खोल नाल्यात कोसळली. बस नाल्यात कोसळल्याने अनेक प्रवासी आत अडकले होते. अपघाताची माहिती मिळताच चिकलठाणा पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी बसच्या काचा फोडून अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढलं. त्यानंतर जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं.

गोकुळच्या नवनिर्वाचित संचालकांच्या पहिल्याच बैठकीत मोठा निर्णय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

चेअरमन : मी सतेज पाटलांना फोन करणार!



कोल्हापूर - गोकुळच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची आज (१४ नोव्हेंबर) पहिली बैठक पार पडली.

गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष राजेश पाटील यांनी बोलवलेल्या बैठकीला महायुतीप्रणित छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीसह सतेज पाटलांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे देखील संचालक उपस्थित राहिले. समविचारी आणि महायुतीसह शासन नियुक्त चार संचालकांच्या उपस्थितीत आजची बैठक पार पडली. या पहिल्या बैठकीत गोकुळ दुधाच्या खरेदी विक्री दरात वाढ करण्याबाबत महत्वाचा निर्णय घेणार असल्याची माहिती गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष राजेश पाटील यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितले. गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष राजेश पाटील काय म्हणाले? मुंबईतील वितरणकांसोबत चर्चा करून दूध दरवाढीचा निर्णय घेणार आहोत.

आज याबाबत संचालकांमध्ये चर्चा झाली. गोकुळच्या दूध उत्पादकांनासुद्धा बुधवारपर्यंत गोड बातमी देणार आहोत. अमूल आणि मदर डेअरीने दूध दरवाढ केली आहे.

गोकुळमध्ये मागील ६ महिन्यात तोटा झालेला आहे, यावर चर्चा झाली आहे. या तोट्यावर कार्यकारी संचालक यांच्याकडूनही अहवाल मागवला आहे. यावर स्वतंत्र बैठक घेऊन चर्चा करणार असल्याची माहिती राजेश पाटील यांनी दिली. सर्वांना विश्वासात घेऊन गोकुळ दूध दरवाढ पुढील आठवड्यात होणार आहे.

जि.प.जलसंधारण विभागाच्या उपविभागीय कार्यालयातील

उपविभागीय जलसंधारण अधिकारी अमरावतीहून पाहाताहेत कारभार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड - जिल्हा परिषद जलसंधारण विभागाच्या वरुड येथील उपविभागीय कार्यालयातील उपविभागीय जलसंधारण अधिकारी सातत्याने अनुपस्थित राहत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून केल्या जात आहे. विशेष म्हणजे वरुडच्या कार्यालयाचा कारभार या महिला अधिकारी थेट अमरावतीहून हाकत असल्यामुळे आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे, त्यामुळे या महिला अधिकाऱ्याची चौकशी करुन समज द्यावा, अशी मागणी होत आहे.

उपविभागीय जलसंधारण अधिकारी पल्लवी मांडवगणे या वरुड येथील कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याचा आरोप होत असून त्यामुळे नागरिकांच्या शासकीय कामांचा खोळंबा होत असल्याचे चित्र समोर येत आहे. शासनाच्या विविध योजना, जलसंधारणाची कामे, शेतकऱ्यांच्या समस्या, प्रलंबित प्रस्ताव, कामांची माहिती तसेच प्रशासकीय कामांसाठी ग्रामीण भागातील नागरिकांना या कार्यालयात वारंवार यावे लागते. मात्र कार्यालयात गेल्यानंतर संबंधित अधिकारी भेटत नसल्याने नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. अनेक नागरिक आपली शेतीची कामे बाजूला ठेवुन वेळ आणि पैसा खर्च करुन कार्यालयात येतात मात्र अधिकारी उपस्थित नसल्यास त्यांचा संपूर्ण दिवस वाया जातो. विशेष म्हणजे, उपविभागीय अधिकाऱ्यांची भेट घ्यायची असल्यास नागरिकांना वरूडऐवजी थेट अमरावती येथे जावे लागत असल्याची चर्चा परिसरात आहे. मग वरुड येथे उपविभागीय कार्यालय नेमके कशासाठी सुरु ठेवण्यात आले आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

कार्यालय वरुडला, अधिकारी अमरावतीला?

शासकीय कार्यालयांची निर्मिती ही नागरिकांना त्यांच्या स्थानिक परिसरातच प्रशासकीय सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने करण्यात आली आहे. मात्र संबंधित अधिकारी मुख्यालयी उपस्थित राहत नसतील आणि नागरिकांना प्रत्येक कामासाठी वरिष्ठ अधिकारी किंवा संबंधित अधिकाऱ्यांचा शोध घ्यावा लागत असेल तर अशा कार्यालयांचा उपयोग तरी काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कार्यालयातील उपस्थितीची नोंद, मुख्यालयी वास्तव्याचे नियम, नागरिकांच्या तक्रारी आणि प्रलंबित कामांचा आढावा घेणे गरजेचे आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाचा अजब कारभार!

एका बाजूला शासन प्रशासन लोकाभिमुख आणि पारदर्शक करण्याच्या घोषणा केल्या जातात तर दुसरीकडे स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या कार्यालयांमध्ये अधिकारी उपलब्ध नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचा शासकीय यंत्रणेवरील विश्वास कमी होण्याची शक्यता आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करुन वस्तुस्थिती स्पष्ट करावी. संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीची तपासणी करावी, कार्यालयीन कामकाज नियमित सुरु राहील याची दक्षता घ्यावी आणि नागरिकांना होणारा त्रास थांबवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दुष्काळी स्थितीत जलसंधारण अधिकारीच गायब

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी जलसंधारण विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असताना वरुड येथील जिल्हा परिषद जलसंधारण उपविभागीय कार्यालयातील अधिकारी नियमित उपलब्ध नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. उपविभागीय जलसंधारण अधिकारी पल्लवी मांडवगणे यांच्या अनुपस्थितीमुळे शेतकऱ्यांना विविध कामांसाठी वारंवार कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. एकीकडे पाणीटंचाई आणि दुष्काळाशी सामना करणारा शेतकरी मदतीच्या अपेक्षेने कार्यालयात येतो, मात्र अधिकारीच भेटत नसल्याने त्याची अडचण अधिकच वाढत आहे. वरिष्ठ जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन चौकशी करावी आणि शेतकऱ्यांना नियमित सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे. आता जिल्हा परिषद प्रशासन या प्रकाराची दखल घेऊन कारवाई करणार की नागरिकांना असेच कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागणार? याकडे वरुड तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

ब्लू फ्लॅग मानांकनासाठी सिंधुदुर्गचे किनारे प्रतीक्षेत : भोगवेचा २०१९ पासूनचा प्रवास खडला

रत्नागिरी-रायगडची आंतरराष्ट्रीय मानांकनात भरारी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




मुंबई – आंतरराष्ट्रीय स्तरावर समुद्रकिनाऱ्यांच्या स्वच्छता, सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक व्यवस्थापनासाठी दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'ब्लू फ्लॅग' मानांकनाच्या यादीत रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांतील समुद्रकिनाऱ्यांचा समावेश झाला आहे. मात्र, पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भोगवे तसेच मेढा-निवती या किनाऱ्यांना अद्याप या मानांकनाची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटनविकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या प्रस्तावांचे पुढे काय झाले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर आणि लाडघर, तर रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन या समुद्रकिनाऱ्यांना २०२६-२७ या वर्षासाठी ब्लू फ्लॅग मानांकन मिळाले आहे. या मानांकनामुळे संबंधित जिल्ह्यांच्या पर्यटन क्षेत्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळण्यास मदत होणार आहे. मात्र, निसर्गसौंदर्य, स्वच्छ समुद्रकिनारे आणि पर्यटनाची मोठी क्षमता असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचे किनारे या यादीत स्थान मिळिवण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

विलीनीकरणाची माझ्यासमोरच चर्चा : राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांचा गौप्यस्फोट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यात माझ्या उपस्थितीत विलीनीकरणाबाबत चर्चा झाली होती. ही चर्चा ४० ते ४५ मिनिटे चालली होती, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी शुक्रवारी नाशिकमध्ये केला. त्यामुळे राष्ट्रवादीच्या दोन गटांच्या विलीनीकरणाबाबत गांभीर्याने चर्चा सुरू होती, यावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. आपल्यावर शस्त्रक्रिया झाल्यानंतर अजित पवार मला भेटले होते. त्यावेळी जयंत पाटीलही उपस्थित होते. यावेळी चर्चेदरम्यान दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यावे, अशी भूमिका आपण मांडली होती. अजित पवार चांगले नेतृत्व करत आहेत, त्यामुळे एकत्र आले पाहिजे, असे आपण त्यांना सांगितले होते. या चर्चेदरम्यान जयंत पाटील यांनी एकत्र येण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. तुम्ही एनडीएमध्ये सत्तेत आहात, त्यामुळे तुमच्या सहयोगी पक्षांना हे मान्य होईल का, असा सवाल त्यांनी केला. या संदर्भात चर्चा होऊ शकते, असे आपण सांगितले. मात्र, या चर्चेनंतर पुढे काही घडले नाही, असे ते म्हणाले. सुनेत्रा पवार विश्वासात घेतील विलीनीकरणाच्या निर्णयाबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल, असे म्हटले आहे. यावर प्रतिक्रिया देताना भुजबळ यांनी सुनेत्राताई आम्हाला विश्वासात घेऊनच निर्णय घेतील, असा विश्वास व्यक्त केला.

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावर सुनेत्रा पवार, पार्थ एकाकी?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – माझा भाऊ गेला, त्या दिवशी विलीनीकरणाचा विषय संपला, असे सांगून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी दोन्ही गटाच्या संभाव्य विलीनीकरणावर पडदा टाकला असला तरी दिल्लीत आज झालेल्या नेत्यांच्या भेटीगाठी व छगन भुजबळांच्या गौप्यस्फोटामुळे विलीनीकरणाचा विषय संपला नसल्याचे स्पष्ट झाले.

विलीनीकरणानंतर एकसंध पक्षाचे नेतृत्व कुणाकडे यावर एकमत होत नसल्याने सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार एकाकी पडल्याचे चित्र आहे.

दिल्लीत भेटीगाठी वित्त विभागाच्या संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीच्या निमित्ताने शुक्रवारी नवी दिल्लीत सुप्रिया सुळे आणि प्रफुल पटेल यांच्यात सुमारे अर्धा तास चर्चा झाली. या चर्चेत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या विलीनीकरणाचा विषय केंद्रस्थानी असल्याचे सांगण्यात येते. मात्र, या भेटीतील चर्चेचा अधिकृत तपशील समजू शकला नाही. अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही त्यानंतर पटेल यांची भेट घेतल्यानंतर विलीनीकरणाच्या घडामोडीने वेग घेतल्याचे बोलले जाते.

आकडे जुळल्यानंतरच हिरवा कंदील भाजपला संसदेत लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षण विधेयक मंजूर करायचे आहे.

गारपीटचे अनुदान त्वरीत द्या अन्यथा तहसिलदारांच्या कक्षात ठिय्या

शेतकऱ्यांच्या वतीने तहसिलदारांना निवेदनाव्दारे अल्टिमेटम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – गारपीट २०२६ चे मंजूर अनुदान तात्काळ द्या अन्यथा तहसीलदार यांचे कक्षात ठिय्या मांडणार, असा ईशारा शेतकऱ्यांच्या वतीने तहसिलदार यांना एका निवेदनाव्दारे देण्यात आला आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड तालुक्यात सन २०२६ मध्ये मोठ्या प्रमाणात गारपिट झाला व संपुर्ण तालुका गारपीटीने बाधित झाला. या गारपिटाने संत्र्याचे फार मोठे नुकसान होऊन शेतकरी हवालदार झाला होता. त्यावेळी अनेक संघटनांनी शासनाकडे पाठपुरावा केल्याने शासनाने वरुड तालुका गारपिटग्रस्त घोषित करुन गारपीट अनुदान मंजुर केले.

त्यावेळी शेतकऱ्यांना व्ही.के.नंबर देण्यात आले व शेतकऱ्यांनी केवायसी केली परंतु आजपर्यंत अर्ध्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांना गारपिटीचे अनुदान प्राप्त झाले नाही. शेतकऱ्यांच्या वतीने दिवाळी हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनी दिवाळी करण्याकरिता गारपिटीच्या अनुदानाची वाट पाहते पण ते अनुदान आले नाही.

त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेले तहसील कार्यालयात अनुदाबाबत शेतकरी विचारणा करता त्यावेळी कार्यालयाकडून शासन स्तरावरुन अनुदान थांबले असल्याचे सांगण्यात येते, शेतकरी फार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला असून शेतकऱ्यांना या अनुदानाचे खरोखरच गरज आहे, त्यामुळे गारपिटीच्या अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावे, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र उर्फ बबलु पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, किसान न्याय हक्क संघर्ष समिती अध्यक्ष स्वप्निल खांडेकर, ऋषिकेश काकडे, संजय माकोडे, आसिफ अब्दुल, माजी सरपंच हरिदास तुमडाम, गजानन भोंडे, रितेश गेडाम, निलेश सालबर्डे, राजु हरले, शेषराव ढोरे, वासुदेव लोखंडे, गणेश आसरे, मारोतराव ठाकरे व इतर शेतकरी उपस्थित होते.

'बुगू... बुगू...' आवाजाने ग्रामीण भागात दिवाळी पहाट : लोकगीतांतून प्रबोधन, चाबकाचे फटके सहन करत परंपरेचे जतन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



कराड – दिवाळी सणाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना ग्रामीण भागात कडकलक्ष्मीच्या आगमनाने दिवाळी पहाटेची सुरुवात होत आहे. ढोलक्यावर फायबरच्या काठीने ठेका धरत काढला जाणारा 'बुगू... बुगू...' आवाज, पारंपरिक लोकगीते आणि देवीच्या दर्शनासाठी होणारी गर्दी यामुळे गावोगावी दिवाळीचे वातावरण अधिकच भक्तिमय होत आहे. काळ बदलला, विज्ञानाची प्रगती झाली, तरी ग्रामीण भागात कडकलक्ष्मीवरील श्रद्धा आजही कायम असल्याचे चित्र दिसत आहे.

कोवळ उदरनिर्वाहासाठी दिवाळीच्या आधीच शहरांसह ग्रामीण भागात दाखल होणाऱ्या कडकलक्ष्मीच्या जोगव्याला सणाच्या पहाटेपासून सुरुवात होते. अभ्यंगस्नान करून सज्ज झाल्यानंतर डोक्यावर देवीचा देव्हारा घेऊन ही मंडळी गल्लीबोळांत फिरतात. ढोलक्याच्या तालावर 'बुगू... बुगू...' असा आवाज करत घराघरांत जोगवा मागितला जातो. त्यांच्या पारंपरिक लोकगीतांमधून संसारातील सुख-दुःख, कौटुंबिक नातेसंबंध आणि सामाजिक जाणिवांचे दर्शन घडते.

साई भक्तांच्या सायकलने शिर्डी वारीचा

मलकापुरच्या साई मंदिरातून प्रारंभ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



शेंदुरजनाघाट – शेंदुरजना घाट येथील युवा साई भक्तांनी गेल्या साहा वर्षांपासून सुरु केलेली शिर्डी सायकल यात्रा या वर्षी कायम आहे. या सायकल यात्रेला १२ नोव्हेंबरला सकाळी ७ वाजता शहरातील मलकापूर येथील साई मंदिरातून प्रारंभ करण्यात आला.

तत्पूर्वी, मंदिरातील साई बाबांच्या मूर्तीचे दर्शन घेऊन पूजन व आरती करून यात्रेकरु वरुड मार्गे शिर्डी करिता रवाना झाले. वरुड येथील जयटंस चौक येथे वरुडवासीयांनी स्वागत केले व त्यानंतर पुढील प्रवासाला सुरुवात झाली. शेंदुरजनाघाट ते शिर्डी हे ६०० किमी. अंतर अवघ्या ५ दिवसात कापून १७ नोव्हेंबरला शिर्डी येथे पोहोचतील. या यात्रेत ५० साई भक्तांचा समावेश असून ते दररोज १०० ते ११० किमी. अंतर सायकलने कापणार आहेत. त्यांचा पहिला पडाव हा अचलपूर येथे राहणार असून दुसरा पडाव शेगाव येथे राहणार आहे. तेथे श्रींचे दर्शन घेऊन पुढे प्रवासाकरिता निघणार आहे. तिसरा टप्पा जाळीचा देव बुलडाणा येथे राहील. त्यानंतर चौथा टप्पा खुलताबाद भद्रा मारोती येथे राहणार असून तेथून १६नोव्हेंबरला शिर्डी येथे सायकल यात्रेकरु सायंकाळी पोचणार असुन १७ ला सकाळी शिर्डी येथे साईबाबा समाधीचे दर्शन घेऊन १८ नोव्हेंबरला साकाळी शेंदुरजनाघाटला सर्व यात्रेकरू परत येतील.

या यात्रेत संजय जैयस्वाल, कपिल सरोदे, प्रीतम नथीले, अजय टाकरखेडे, ओम राऊत, मयूर देवघरे, विठ्ठल मोहनकर, सुभाष गुल्हाने, राजेश जैयस्वाल, जयकुमार आंडे, लिलाधर वंजारी, मधुकर सिनकर, गजानन चौधरी, नयन डोईजोड, वैभव पाचघरे सागर पातुरकर, आकाश चवरे, प्रतिक बेलसरे, अनिल घोरपडे, प्रकाश सोनकुसळे, प्रितम जोगेकर, शिवा रेवतकर आदींसह साई भक्तांचा समावेश आहे.

शेतीविषयक कामांसाठी बोअरवेल करण्याची परवानगी

जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश : आमदार उमेश यावलकर यांच्या प्रयत्नांना यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




वरुड – अमरावती जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि भूजलपातळीत झालेली घट लक्षात घेता शेतकऱ्यांना शेतीविषयक कामांसाठी बोअरवेल करण्याची परवानगी मिळावी, यासाठी मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी केलेल्या विशेष प्रयत्नांना यश आले आहे.

त्यांच्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी बोअरवेल (विंधन विहीर) तसेच विहीर खोदकाम व ब्लास्टिंगवरील निर्बंध १५ डिसेंबर २०२६ पर्यंत शिथिल करण्याचे आदेश जारी केले आहेत.

अमरावती जिल्ह्यात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून, विशेषतः संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसमोर आपल्या बागा जगविण्याचे मोठे आव्हान उभे आहे. पाण्याअभावी संत्रा बागांचे नुकसान होण्याची भीती असताना शेतीसाठी नवीन बोअरवेल करण्यावरील निर्बंध शेतकऱ्यांसाठी अडचणीचे ठरत होते.

ही बाब लक्षात घेऊन आमदार यावलकर यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत बोअरवेल खोदकामासाठी निर्बंध शिथिल करण्याची मागणी केली होती. मोर्शी-वरूड तालुका हा संत्रा उत्पादकांचा प्रमुख परिसर म्हणून ओळखला जातो. या भागातील हजारो शेतकऱ्यांचे अर्थकारण संत्रा बागांवर अवलंबून आहे. पाणीटंचाईच्या काळात बागांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शेतकऱ्यांना पर्यायी जलस्रोत निर्माण करता येणार असल्याने या निर्णयाचा शेतीविषयक कामांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.



महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय,
कॅम्प, अमरावती -४४४ ६०२
(पाणीपंटाई शाखा)
E-Mail ID : rdc.amravati@gmail.com
Website: https://amravati.gov.in

क्रमांक:म.स./पाणीटंचाई/कावि- ९६० /२०२६ दिनांक :- १२/११/२०२६

आदेश

विषय : अमरावती जिल्ह्यात शेतीविषयक कामांसाठी बोअरवेल (विंधन विहीर)व विहीर खोदकाम/बळकटीकरणावरील निर्बंध दिनांक १५ डिसेंबर २०२६ पर्यंत शिथिल करण्याबाबत.

संदर्भ: १.या कार्यालयाचे आदेश क्र. कक्ष-२७/अ.का./पाटं./कावि-२०८/२०२६ दिनांक ०५.१०.२०२६
२. या कार्यालयाचे आदेश क्र. कक्ष-२७/अ.का./पाटं./कावि-२०९/२०२६ दिनांक ०५.१०.२०२६

अमरावती जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भूजल सोतांचे संरक्षण व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी जिल्हात बोअरवेल (विंधन विहीर) व विहीर खोदकाम/बळकटीकरणावरील निर्बंध लागू करण्यात आलेले आहेत.

तथापि, शेतकऱ्यांची शेतीविषयक कामे, पिकांचे संवर्धन, सिंचनाची आवश्यकता तसेच अन्य कृषीविषयक कामांची निकड विचारात घेता, अमरावती जिल्हात दिनांक १५ डिसेंबर २०२६ पर्यंत शेतीविषयक कोणत्याही कामासाठी आवश्यक असलेल्या नवीन बोअरवेल (विंधन विहीर) व विहीर खोदकाम/बळकटीकरणाकरीता यापूर्वीच्या आदेशान्वये घालण्यात आलेले निर्बंध तात्पुरत्या स्वरूपात शिथिल करण्यात येत आहेत.

त्यानुसार, सदर कालावधीत शेतीविषयक कामांसाठी बोअरवेल (विंधन विहीर)व विहीर खोदकाम/बळकटीकरण करता येईल. यासाठी यापूर्वीच्या आदेशानुसार लागू असलेली विशेष परवानगी घेण्याची अट लागू राहणार नाही.

उक्त सवलत केवळ शेतीविषयक कामांसाठीच लागू राहील. मात्र सदरचे शेतपरीसरात विहीर पुर्नभरण, विंधन विहीर पुर्नभरण, जलतारा व इतर जलसंधारण विषयक उपाययोजना करणे बंधनकारक राहील. इतर कारणांसाठी बोअरवेल खोदकामावरील पूर्वीचे निर्बंध कायम राहतील, तसेच लागू असलेल्या इतर वैधानिक तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेश दिनांक १५ डिसेंबर २०२६ पर्यंत प्रभावी राहील. त्यानंतर यापूर्वीचे बोअरवेल (विंधन विहीर) व विहीर खोदकाम/बळकटीकरणा बाबतचे आदेश पूर्ववत लागू होतील.

हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

(आशिष येरेकर)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती

उपाययोजनांसाठी असलेले निर्बंध कायम राहणार आहेत. तसेच अन्य कारणांसाठी बोअरवेल खोदकामावरील निर्बंध पूर्ववत लागू राहतील.

१५ डिसेंबरपर्यंतच सवलत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ही सवलत १५ डिसेंबर २०२६ पर्यंत प्रभावी राहणार आहे. त्यानंतर यापूर्वीचे निर्बंध पुन्हा लागू होतील.

शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल घेत बोअरवेल खोदकामावरील निर्बंध शिथिल करण्याचा निर्णय झाल्याने संत्रा उत्पादक आणि इतर शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्या पाठपुराव्यामुळे शेतीच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याची चर्चा शेतकरी वर्गात होत आहे.

संपादकीय

भाकरीसाठी शेतीच हवी, केवळ एआय नव्हे!

नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन, शेतीचा विकास आणि रोजगाराभिमुख उद्योग हीच भविष्यातील विकासाची खरी दिशा आज संपूर्ण जग विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगात वेगाने वाटचाल करीत आहे. संगणक, रोबोटिक्स, सेमीकंडक्टर, डेटा सेंटर आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून विकासाची नवी दालने खुली होत आहेत. अमेरिका, चीन यांसारखे प्रगत देश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत. मात्र या तंत्रज्ञानाच्या झगमगाटात एक मूलभूत सत्य विसरून चालणार नाही, ते म्हणजे माणसाच्या जगण्यासाठी सर्वप्रथम अन्न, पाणी आणि निसर्गाची गरज आहे. एआयमुळे जग बदलू शकते, उद्योगांची दिशा बदलू शकते; परंतु माणसाची भूक भागविण्यासाठी आजही शेतात पिकणारे धान्यच आवश्यक आहे. अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकीच्या संदर्भातून पुढे आलेला संदेशही याच वास्तवाकडे लक्ष वेधणारा आहे. आधुनिक तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी सामान्य माणसाच्या जीवनातील मूलभूत प्रश्न महत्त्वाचेच राहतात. महागाई, रोजगार, अन्नसुरक्षा, शेती आणि आर्थिक स्थैर्य या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ तंत्रज्ञानाच्या विकासाला प्रगती म्हणता येणार नाही. विकासाची खरी कसोटी ही सर्वसामान्य माणसाचे जीवन किती सुखकर झाले, यावर ठरली पाहिजे. भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी हा संदेश अधिक महत्त्वाचा आहे. देशातील मोठा लोकसमूह आजही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी उन्हातान्हात कष्ट करून धान्य, फळे, भाजीपाला आणि अन्य कृषी उत्पादने निर्माण करतो. मात्र त्याच शेतकऱ्याला कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ, कधी बाजारभावातील घसरण, तर कधी उत्पादन खर्चातील वाढ अशा संकटांना सामोरे जावे लागते. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे आपण नेहमी म्हणतो; परंतु या कण्याला बळकटी देण्यासाठी प्रत्यक्षात किती प्रयत्न होतात, हा विचार करण्याचा विषय आहे. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड आवश्यक शेती आणि तंत्रज्ञान यांच्यात संघर्ष नसून समन्वय असणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक सिंचन पद्धती, हवामानाचा अचूक अंदाज, माती परीक्षण, ठिबक सिंचन आणि कृषी संशोधन यांचा योग्य वापर केल्यास शेती अधिक फायदेशीर होऊ शकते. मात्र तंत्रज्ञानाचा लाभ केवळ मोठ्या उद्योगांपुरता किंवा संपन्न घटकांपुरता मर्यादित राहता कामा नये. ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्यांपर्यंतही आधुनिक तंत्रज्ञान पोहोचले पाहिजे. आज विदर्भातील शेतकरी पाण्याच्या प्रश्नाने त्रस्त आहे. विशेषतः अमरावती जिल्ह्यातील वरूड, मोर्शी आणि परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसमोर नैसर्गिक संकटांचे मोठे आव्हान उभे आहे. संत्रा बागा जगविण्यासाठी पाण्याची उपलब्धता, सिंचनाच्या सुविधा आणि शाश्वत जलव्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. भूजल पातळी सातत्याने खालावत असताना पाण्याचा अनियंत्रित वापर भविष्यासाठी धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे जलसंधारण, शेततळी, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि सूक्ष्म सिंचनाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.



जिंकण्याचा आनंद तेव्हाच मिळतो, जेव्हा संघर्ष स्वतःचा आणि प्रयत्न प्रामाणिक असतात

जयप्रकाश टोंगसे : सेवानिवृत्त आदर्श शिक्षक

आयुष्याच्या ७५ वर्षांचा सुवर्णमय प्रवास पूर्ण करणारे, वरुडचे भूषण, सेवानिवृत्त आदर्श शिक्षक जयप्रकाश नारायणराव टोंगसे यांना अमृत महोत्सव निमित्त कोटी कोटी शुभेच्छा. शिक्षक हा केवळ नोकरी करणारा माणूस नसतो, तर तो समाज घडवणारा शिल्पकार असतो. आणि जयप्रकाशजी हे तर असे शिल्पकार आहेत, ज्यांनी आपल्या आयुष्यात कित्येक विद्यार्थी घडविले, त्यांना योग्य दिशा दिली, त्यांचे भविष्य उज्वल केले.

जिल्हा परिषद, अमरावती येथे शिक्षक म्हणून त्यांनी अनेक वर्षे सेवा केली. त्या काळात त्यांनी कधीही नोकरी म्हणून काम पाहिले नाही, तर ती एक सेवा, एक पूजा मानली. सकाळी शाळेत सर्वात आधी पोहोचणे, वर्ग स्वच्छ ठेवणे, प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष देणे, मागे राहिलेल्या विद्यार्थ्याला प्रेमाने शिकवणे, हे त्यांचे रोजचे काम होते. त्यांच्या वर्गात गरीब-श्रीमंत, हुशार-




कमी हुशार असा भेद कधीच नव्हता. सर्व मुले त्यांना सारखीच होती. त्यामुळेच आज त्यांचे विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, शेतकरी, अधिकारी, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रात यशस्वी आहेत, आणि ते सर्वजण आजही त्यांना गुरु म्हणून आदराने नमन करतात.

शिस्त आणि समर्पण, म्हणजेच शिस्त आणि समर्पण हे त्यांच्या जीवनाचे दोन सर्वात मोठे गुण आहेत. शिस्त म्हणजे काय, हे त्यांनी स्वतःच्या जीवनातून दाखवुन दिले. वेळेचे पालन, नियमितता, अभ्यास, वेशभूषेतील नीटनेटकेपणा, बोलण्यातील स्पष्टता, या सर्व गोष्टींमध्ये ते अत्यंत काटेकोर होते. शाळेत उशीर करणे, कामात चालढकल करणे, हे त्यांना कधीही मान्य नव्हते. ते नेहमी सांगायचे, विद्यार्थी शिक्षकाकडे पाहून शिकतो. शिक्षक शिस्तप्रिय असेल, तर विद्यार्थीही शिस्तप्रिय होतो.

त्यांचे समर्पणही तितकेच मोठे होते. शाळा सुटल्यानंतरही ते विद्यार्थ्यांसाठी वेळ द्यायचे. एखाद्या विद्यार्थ्याला पुस्तक नसेल तर स्वतःच्या पैशाने पुस्तक आणुन द्यायचे. एखाद्या विद्यार्थ्याच्या घरी अडचण असेल, तर घरी जाऊन पालकांना समजवायचे. शिक्षक म्हणजे केवळ पुस्तक शिकवणारा नाही तर विद्यार्थ्याचे आयुष्य घडवणारा असतो, ही त्यांची श्रद्धा होती. त्यामुळेच त्यांना आदर्श शिक्षक हा किताब केवळ मिळाला नाही तर त्यांनी तो आपल्या कृतीने सार्थ केला. एक शिक्षक म्हणुन ते जितके महान आहेत, तितकेच एक वडील म्हणूनही ते आदर्श आहेत. त्यांना दोन मुले, चंद्रकांत आणि अंजली. दोघांनाही त्यांनी उत्तम संस्कार दिले. केवळ शिक्षण दिले नाही, तर माणूस म्हणून कसे जगावे, हे शिकवले. प्रामाणिकपणा, मेहनत, आदर, सेवा, ही मुल्ये त्यांनी मुलांमध्ये रुजवली. आज चंद्रकांत आणि अंजली हे आपल्या कुटुंबासह सुंदर संसार करत आहेत आणि त्यांच्या यशामागे वडिलांचे आशीर्वाद आणि संस्कार आहेत. सुंदर संसार म्हणजे मोठे घर नाही तर प्रेम, विश्वास आणि एकमेकांबद्दल आदर असलेले घर असते, आणि टोंगसे कुटुंब हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

समाजातही त्यांचे स्थान अत्यंत आदरणीय आहे. वरुडमध्ये त्यांचे नाव घेतले की लोक आदराने मान झुकवतात. सेवानिवृत्त झाल्यानंतरही ते समाजापासून दूर गेले नाहीत. आजही ते तरुणांना मार्गदर्शन करतात, समाजाच्या कामात सहभागी होतात, सुखदुःखात धावून जातात. निवृत्ती म्हणजे कामातून निवृत्ती, पण सेवेतून नाही, हे त्यांनी दाखवून दिले.

आज १३ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांचा अमृत महोत्सव साजरा होत असताना, आम्ही सर्व विद्यार्थी, मित्र, नातेवाईक आणि वरुडकर यांच्या वतीने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो. सर, तुम्ही आमचे गुरु आहात, आमचे मार्गदर्शक आहात, आमचे प्रेरणास्थान आहात. तुम्हाला उत्तम आरोग्य, दीर्घ आयुष्य लाभो. तुमचे आशीर्वाद आम्हाला आयुष्यभर मिळत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



दशरथ गाडगे
माजी विस्तार अधिकारी
पं.स.वरुड, जि.अमरावती

बालपण जपूया, उद्याचा भारत घडवूया!

बालदिन हा केवळ उत्सवाचा दिवस नव्हे, तर प्रत्येक बालकाच्या स्वप्नांना, शिक्षणाला, सुरक्षिततेला आणि उज्ज्वल भविष्याला दिशा देण्याचा संकल्पदिन!

भारताचे भविष्य आजच्या बालकांच्या हातात आहे, असे आपण नेहमी म्हणतो. परंतु या भविष्याची पायाभरणी किती भक्कम करीत आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. बालक म्हणजे केवळ घरातील आनंद नव्हे, तर समाजाच्या आणि राष्ट्राच्या उद्याच्या वाटचालीचा आधार आहे. त्यांच्या निरागस हास्यात उद्याच्या भारताचे स्वप्न दडलेले आहे. त्यांच्या डोळ्यांतील चमक ही नव्या आशेची खूण आहे आणि त्यांच्या कल्पनाशक्तीत देशाला प्रगतीच्या शिखरावर नेण्याची क्षमता आहे. म्हणूनच बालकांचे संगोपन, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता ही केवळ कुटुंबाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे.

दरवर्षी १४ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारतात बालदिन म्हणून साजरा केला जातो. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस बालदिन म्हणून ओळखला जातो. नेहरूंना लहान मुलांविषयी विशेष प्रेम होते. मुलांना ते प्रेमाने 'चाचा नेहरू' म्हणत. मुलांमध्ये देशाचे उज्ज्वल भविष्य पाहणाऱ्या नेहरूंच्या विचारांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. मात्र बालदिन साजरा करण्याचा खरा अर्थ केवळ शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम घेणे, भाषणे करणे किंवा मुलांना मिठाई वाटणे एवढाच मर्यादित नसावा. प्रत्येक बालकाला आनंदी, सुरक्षित आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे, हाच या दिवसाचा खरा संदेश आहे.

बालपण हे आयुष्याचा अमूल्य ठेवा बालपण हा प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वांत सुंदर आणि महत्त्वाचा टप्पा असतो. खेळणे, बागडणे, मित्रांसोबत आनंदाने वेळ घालवणे, नवनवीन गोष्टी शिकणे आणि मोठी स्वप्ने पाहणे, हे बालपणाचे वैशिष्ट्य आहे. मात्र आजच्या स्पर्धात्मक युगात बालपणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. अभ्यासाचे वाढते ओझे, परीक्षांची स्पर्धा, मोबाईलचा अतिवापर आणि पालकांच्या अपेक्षांचा दबाव यामुळे अनेक मुलांच्या निरागस बालपणावर परिणाम होत आहे.

मुलांनी अभ्यासात चांगले गुण मिळवावेत, मोठे व्हावे आणि आयुष्यात यशस्वी व्हावे, ही प्रत्येक पालकांची इच्छा असते. परंतु या अपेक्षांचे ओझ्याखाली मुलांचे बालपण हरवू नये, याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक मूल वेगळे असते. कोणाला विज्ञानाची आवड असते, कोणाला कला, कोणाला खेळ, तर कोणाला संगीताची. प्रत्येक मुलाच्या क्षमतेचा आणि आवडीचा आदर करून त्याला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

शिक्षण हाच उज्ज्वल भविष्याचा पाया शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणामुळे मुलांमध्ये विचार करण्याची क्षमता, आत्मविश्वास, विवेक आणि योग्य-अयोग्य यातील फरक समजण्याची जाणीव निर्माण होते. मात्र आजही समाजातील अनेक घटकांतील मुलांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी सहज उपलब्ध होत नाहीत. ग्रामीण भागातील शाळांमध्ये आवश्यक सुविधा, डिजिटल शिक्षणाची साधने, ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित राहता कामा नये. मुलांना विज्ञान, क्रीडा, कला, संस्कार, पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारी यांचेही शिक्षण मिळाले पाहिजे. गुणांच्या स्पर्धेपेक्षा ज्ञानाची आवड निर्माण झाली पाहिजे. कारण गुणपत्रिकेतील गुण आयुष्यातील संपूर्ण यश निश्चित करीत नाहीत; तर विचार करण्याची क्षमता, मेहनत, प्रामाणिकपणा आणि आत्मविश्वास माणसाला खऱ्या अर्थाने घडवतात.



बालमजुरी आणि बालशोषणमुक्त समाजाची गरज बालदिन साजरा करताना समाजातील वंचित आणि गरजू बालकांचा विसर पडता कामा नये. आजही अनेक ठिकाणी आर्थिक परिस्थितीमुळे लहान मुलांना शिक्षणाऐवजी काम करावे लागते. काही मुलांना शिक्षण, पोषण आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागते. बालमजुरी, बालविवाह, बालशोषण आणि मुलांच्या सुरक्षेचे प्रश्न ही समाजासमोरील गंभीर आव्हाने आहेत.

प्रत्येक बालकाला शिक्षण, संरक्षण, पोषण आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे. कोणत्याही मुलाचे बालपण गरिबी, शोषण किंवा असुरक्षिततेच्या सावटाखाली राहता कामा नये. समाजातील प्रत्येक सुजाण नागरिकाने अशा समस्यांविरोधात जागरूक राहून बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

मोबाईलच्या जगात हरवणारे बालपण आज तंत्रज्ञानाने संपूर्ण जग जवळ आणले आहे. मोबाईल, इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांमुळे मुलांना ज्ञानाचे नवे स्रोत उपलब्ध झाले आहेत. मात्र त्याचबरोबर स्क्रीनचा अतिवापर, ऑनलाइन व्यसन, चुकीची माहिती आणि आभासी जगातील वाढता वेळ ही चिंतेची बाब बनली आहे. मुलांना तंत्रज्ञानापासून दूर ठेवणे हा उपाय नाही, तर त्याचा योग्य आणि मर्यादित वापर शिकविणे आवश्यक आहे.

मैदानी खेळ, मैत्री, वाचन, निसर्गभ्रमंती आणि प्रत्यक्ष अनुभव यांनाही त्यांच्या आयुष्यात महत्त्व मिळाले पाहिजे. मोबाईलच्या पडद्यापलीकडेही एक सुंदर जग आहे, याची जाणीव मुलांना करून देणे ही पालक आणि शिक्षकांची जबाबदारी आहे.

पालक आणि शिक्षकांची भूमिका महत्त्वाची मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासात पालक आणि शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मुलांना केवळ सूचना देण्यापेक्षा त्यांचे म्हणणे ऐकून घेणे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि त्यांच्या भावनांचा आदर करणे आवश्यक आहे. मुलांशी संवाद साधताना त्यांच्यावर सतत टीका करण्याऐवजी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसतो, तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना योग्य संधी देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे ही शिक्षकांची मोठी जबाबदारी आहे. पालक आणि शिक्षक यांच्यात समन्वय असेल, तर मुलांचा सर्वांगीण विकास अधिक चांगल्या पद्धतीने होऊ शकतो.

बालकांच्या स्वप्नांतूनच विकसित भारताची निर्मिती आजचे बालक उद्याचे डॉक्टर, अभियंते, शास्त्रज्ञ, शिक्षक, शेतकरी, उद्योजक, कलाकार आणि देशाचे जबाबदार नागरिक असणार आहेत. त्यामुळे त्यांना केवळ परीक्षांसाठी तयार न करता जीवनासाठी तयार करणे आवश्यक आहे. त्यांच्यात देशप्रेम, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी मूल्यांची रुजवणूक झाली पाहिजे.

ग्रामीण आणि शहरी भागातील मुलांना समान संधी मिळाल्या पाहिजेत. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही मुलाचे स्वप्न अपूर्ण राहता कामा नये. गुणवत्तेला प्रोत्साहन देणारी आणि गरजू विद्यार्थ्यांना आधार देणारी शिक्षणव्यवस्था उभी राहिली, तरच खऱ्या अर्थाने विकसित भारताचे स्वप्न साकार होईल.

बालदिनाचा संकल्प केवळ एका दिवसापुरता नको! बालदिनाच्या निमित्ताने शाळांमध्ये विविध उपक्रम आयोजित केले जातात. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारे कार्यक्रम होतात. परंतु हा आनंद केवळ एका दिवसापुरता मर्यादित राहू नये.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

मदर डेअरी, अमूलपाठोपाठ आता गोकुळचे दूधही महागणार? दरवाढीच्या हालचाली सुरू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

कोल्हापूर – मदर डेअरी, अमूलपाठोपाठ गोकुळ दुधाच्या दरातही वाढीचे संकेत देण्यात आले आहेत. गोकुळच्या दुधाच्या दरात वाढ करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. गोकुळचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेश पाटील यांनी तसे



सुतोवाच केले आहे.

शनिवारी होणाऱ्या नव्या कार्यकारिणीच्या पहिल्या बैठकीत दूध दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. दोनच दिवसांपूर्वी अमूलने दुधाच्या दरात वाढ केली होती. त्यानंतर आता गोकुळनेही दूध दरामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतल्यास वाढलेल्या महागाईने हैराण झालेल्या सर्वसामान्यांना त्याची झळ बसणार आहे.

आसामच्या काझीरंगा महामार्गावर भीषण अपघात, २६ जणांचा दुर्दैवी अंत

पंतप्रधान मोदींकडून दुःख व्यक्त करत मृतांच्या नातेवाईकांसाठी २ लाख रुपयांची मदत जाहीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – आसाममधील काझीरंगा येथे बस आणि ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातातील मृतांची संख्या २६ झाली आहे. पोलिसांनी या अपघाताला दुजोरा दिला आणि गोलाघाट जिल्ह्याचे जिल्हा आयुक्त बिस्वजीत फुकन यांनी सांगितले की, आसामच्या गोलाघाट जिल्ह्यातील



काझीरंगाजवळील रंगाझान परिसरात झालेल्या अपघातात २६ जण ठार झाले असून अनेक जण जखमी झाले आहेत. तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाममधील काझीरंगा येथील गोलाघाटमध्ये झालेल्या भीषण रस्ते अपघाताबाबत शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधानांनी राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली आहे. पंतप्रधान कार्यालयाने पंतप्रधानांचे एक निवेदन इन्स्टाग्रामवर शेयर केले आहे. त्यात पंतप्रधान म्हणाले, 'आसामच्या गोलाघाट जिल्ह्यातील अपघातात झालेल्या जीवितहानीमुळे मला तीव्र दुःख झाले आहे. या दुःखाच्या प्रसंगी, मी शोकाकुल कुटुंबांप्रति माझ्या संवेदना व्यक्त करतो. जखमी लवकरात लवकर बरे व्हावेत अशी मी प्रार्थना करतो.'

भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २० नोव्हेंबरपासून

'स्टोरीज विदाऊट बॉर्डर्स' संकल्पना : ८६ देशांतील १५० पेक्षा जास्त चित्रपटांची पर्वणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – ५७वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (ईफी) गोव्यात २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. 'स्टोरीज विदाऊट बॉर्डर्स' ही यंदाच्या महोत्सवाची संकल्पना आहे.



या महोत्सवाच्या निमित्ताने जगभरातील चित्रपटकर्मी, चित्रपट रसिक आणि सर्जनशील कलाकार एकत्र येणार आहेत. यंदा या महोत्सवासाठी १३७ देशांमधून १,९०० हून अधिक चित्रपटांच्या प्रवेशिका प्राप्त झाल्या आहेत. यंदाच्या महोत्सवात ८६ देशांतील १५० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय चित्रपट दाखवले जाणार आहेत.

यासोबतच या महोत्सवाच्या माध्यमातून आंतरसांस्कृतिक देवाणघेवाण, कथात्मक मांडणीतली वैविध्यपूर्णता आणि चित्रपटसृष्टीतील उत्कृष्टतेसाठी एक बहुआयामी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. ५७व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची पूर्वतयारी आणि महोत्सवाच्या रुपरेषेची झलक मांडणारी अर्थात कर्टन रेझर पत्रकार परिषद शुक्रवारी गोव्यातील ताज सिदाद दे गोवा होरायझन इथे पार पडली. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी भारतीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटसृष्टीचा गौरव करणाऱ्या महोत्सवाच्या विस्तृत कार्यक्रमाचे अनावरण केले. भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासोबतच्या गोव्याच्या नात्याबद्दल त्यांनी अभिमान व्यक्त केला.

हा महोत्सव राज्याच्या सांस्कृतिक ओळखीचा आणि वार्षिक दिनदर्शिकेचा अविभाज्य भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी गोवा मनोरंजन संस्थेच्या उपाध्यक्ष लोबो, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार, राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे अध्यक्ष कृष्ण कुमार आणि महोत्सवाचे संचालक आशुतोष गोवारीकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यासोबतच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव प्रभात, कथात्मक चित्रपट (फीचर) परीक्षक मंडळाचे अध्यक्ष मधुर भांडारकर आणि कथाबाह्य चित्रपट परीक्षक मंडळाचे अध्यक्ष हिमांशू शेखर खटुआ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.


डवरगांव रस्त्याच्या कामाची वर्क ऑर्डर ८ दिवसांत द्या

अंकुश बोडनासे यांची कार्यकारी अभियंता यांचेकडे मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – मांगरुळी रस्ता ते डवरगाव व जरुड अप्रोच रोड ते डवरगाव या जिल्हा परिषद अंतर्गत मंजूर असलेल्या रस्त्यांच्या कामांचे वर्क ऑर्डर ८ दिवसांच्या आत काढून प्रत्यक्ष कामे सुरू करण्यात यावी, अशी मागणी अंकुश बोडनासे यांनी जि.प.बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता यांचेकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, मांगरुळी रस्ता ते डवरगाव ग्रा.मा. क्र. ३८ तसेच जरुड अप्रोच रस्ता ते डवरगाव ग्रा. क्र. १३८ या दोन्ही रस्त्यांच्या कामांना जिल्हा परिषद अंतर्गत मंजुरी





मिळालेली आहे. मात्र, अद्याप या कामांचे वर्क ऑर्डर काढण्यात आलेले नसल्याने प्रत्यक्ष कामांना सुरुवात झालेली नाही.

सदर रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असून, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, नागरिक तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या रस्त्यांवरून वाहतूक करणे अत्यंत कठीण होते.

शासनाकडून रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळूनही वर्क ऑर्डर काढण्यासाठी दीड ते दोन वर्षांचा कालावधी लागत असेल आणि प्रत्यक्ष कामे सुरू होण्यासाठी आणखी विलंब होत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांना विकासकामांचा लाभ कधी मिळणार? हा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे.

सदर दोन्ही रस्त्यांच्या कामांचे वर्क ऑर्डर ८ दिवसांच्या आत काढून प्रत्यक्ष कामे सुरू न केल्यास जिल्हा परिषद प्रशासनाच्या विरोधात डवरगाव नागरिक, गावकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल तसेच उपोषणाचा मार्ग स्विकारण्यात येईल, असा ईशारा सुध्दा अंकुश बोडनासे यांनी दिला आहे.

नागपुरात दहा महिन्यांत तब्बल २२४ जणांचा रस्ते अपघातात मृत्यू : रात्री ९ ते १२ काळ ठरतोय सर्वाधिक धोकादायक

आता रस्ता सुरक्षा समितीकडून महत्वाचे आदेश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नागपुर – नागपुरात दहा महिन्यांत तब्बल २२४ जणांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. सोबतच रात्री ९ ते १२ हा अपघातांच्या दृष्टीने सर्वाधिक धोकादायक काळ असल्याचीही माहिती आहे. २०२५ मध्ये याच दहा महिन्यांत



२५३ जणांचा मृत्यू झाला होता. तर यंदा मृत्यूंच्या संख्येत ११ टक्क्यांनी घट झाली असली तरी मात्र शहरातील १४ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अपघाती मृत्यूंची संख्या वाढली आहे. त्यामुळे रोड अपघात ही कमी करण्याकरता प्रशासना पुढे नेमकं काय पाऊल उचलतं हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दहा अति अपघातप्रवण मार्गांपैकी सात मार्गांवर अपघाती मृत्यू वाढले आहेत. तर अतिवेग हे अपघाती मृत्यूंचे प्रमुख कारण असल्याचे रस्ता सुरक्षा समितीच्या आढाव्यात स्पष्ट झालं आहे. दुचाकीस्वारांचे येता मृत्यू सर्वाधिक असून विनाहेल्मेट आणि विरुद्ध दिशेने वाहन चालविणे जीवघेणे ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे. सोबतच मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांवर रात्री आणि वीकेंडला विशेष तपासणीचे निर्देश आले आहे. तर विनाहेल्मेट आणि वाहन विम्याशिवाय पेट्रोल न देण्याच्या नियमाची कठोर अंमलबजावणी देखील केली जाणार असल्याची माहिती आहे.

शहरातील सर्व रस्त्यांचे सुरक्षा परीक्षण ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दरम्यान, शहरातील सर्व रस्त्यांचे सुरक्षा परीक्षण ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून खड्डे, खराब रस्ते आणि अभियांत्रिकी त्रुटी दूर करण्याचे आदेश यात देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालय नियुक्त रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती अभय सप्रे यांनी या संदर्भात निर्देश दिले आहे. परिणामी आता जानेवारी २०२७ मध्ये पुन्हा नागपूर दौरा करून उपाययोजनांचा आढावा घेतला जाणार असल्याची माहिती आहे. गोंदियाच्या डोंगरगाव येथील घटना गोंदिया-भंडारा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या लाखांदूर-सानगडी महामार्गावर डोंगरगाव गावाजवळ झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

संकटात शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या कर्जमाफी व अग्रीम मदतीचे बळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून मिळालेली २ लाखांची कर्जमाफी आणि दिवाळीपूर्वी शासनाकडून मिळालेल्या ५ हजारांच्या अग्रीम रक्कमेतून दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या अमरावती तालुक्यातील पिंपरी गावच्या शेतकऱ्यांनी बळ मिळाल्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

वेळोवेळी शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देत पाठबळ द्यावे, अशा अपेक्षाही मांडल्या.

शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या टप्प्यात २ लाख रुपयांचे कर्ज माफ झाल्याने ऋषिकेश प्रकाशराव महल्ले या शेतकऱ्याने राज्य शासनाचे आभार मानून असेच संकटात सापडलेल्या



असेच पाठबळ देण्याची शेतकऱ्यांनी व्यक्त केली अपेक्षा

शेतकऱ्यांना शासनाने वेळोवेळी मदत करावी अशी अशा भावना व्यक्त केल्या. ऐन दिवाळीला राज्य शासनाने अग्रीम मदत दिल्याने दिलासा मिळाला.

शासन असेच वेळोवेळी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्यास शेतकरी आत्महत्याच करणार नाहीत, असे योगेश अंबादास भुयार यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीमुळे यावर्षी शेतकऱ्यांची दिवाळी काळी होण्याचे चित्र होते.

मात्र, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ हजारांची अग्रीम रक्कम देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या घोषणेनुसार ४ नोव्हेंबर रोजी बँक खात्यामध्ये अग्रीम जमा झाला आणि आपल्यासह राज्यातील शेतकऱ्यांची दिवाळी आनंदाची झाली.

शासनाने वेळोवेळी शेतकऱ्यांना आवश्यक मदत करावी आणि मिळालेल्या निधीचा शेतकऱ्यांनीही उचित विनियोग करावा असे स्वप्निल राजेंद्र महल्ले यांनी सांगितले.

दिवाळी सणापूर्वी शासनाची अग्रीम मदत मिळाल्याचे व त्याबद्दल समाधान व्यक करुन राजेंद्र पंजाबराव महल्ले यांनी दुष्काळी परिस्थितीबाबत सांगितले. दुष्काळाची दाहकता सर्वत्र जाणवत आहे. विहीरी व बोअरवेलच्या पाण्याची पातळी कमालीची घटली आहे. पाण्याअभावी तूर आणि कपासीचे पीक सुकून गेले आहे. पावसाच्या कमतरतेमुळे जमिनीला भेगा पडल्या आहेत. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ढासळली आहे. शेतकऱ्यांना शासनाकडून आवश्यक ती मदत मिळावी अशी अपेक्षा त्यांनी व्यकत केली. दिवाळी अग्रीम मदत मिळाल्याचे सांगून संकटात सापडलेल्या सर्व शेतकऱ्यांना शासनाने मदत करावी अशा भावना दिनेश अंबादास भुयार यांनी व्यक्त केल्या.

दरम्यान, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना,२०२६' अंतर्गत अमरावती जिल्ह्यात चार टप्प्यात एकूण ८१ हजार ६१८ लाभार्थी शेतकरी कुटुंबांना ७८३ कोटी २२ लाख रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिवाळीपूर्वी प्रत्येकी ५ हजार रुपयांप्रमाणे ३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष रक्कम जमा करण्यात आली आहे.

१७ नोव्हेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

'जाधव गियर्स' कंपनीतील १३० जागांसाठी भरती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)


अमरावती – जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १७ नोव्हेंबर रोजी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अमरावती येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात 'जाधव गियर्स,प्रिसीजन मॅपिंग,जिनस कंपनीमध्ये उमेदवारांना १३० पदांची संधी मिळणार आहे.

नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींसाठी या रोजगार मेळाव्याद्वारे रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. या मेळाव्यात जाधव गियर्स,प्रिसीजन मॅपिंग,जिनस कंपनीमध्ये प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेतील. मुलाखतीमध्ये पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी दिली जाणार आहे.

या भरती प्रक्रियेद्वारे विविध १३० पेक्षा जास्त जागा भरल्या जाणार आहेत. या पदांसाठी उमेदवार पदवीधर असणे आवश्यक असून एम.बी.ए. पदवी धारकाला प्राधान्य असेल किंवा उमेदवार पदव्युत्तर पदवी धारक असावा. उमेदवाराकडे उत्तम संभाषण कौशल्य असणे आवश्यक आहे. तसेच इंग्रजी, हिंदी आणि मराठी या भाषांचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. इच्छुक उमेदवारांनी १७ नोव्हेंबर रोजी स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट साईझ फोटो आणि सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह (व छायांकित प्रतींसह) केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे. याबाबत काही अडचण किंवा अधिक माहिती माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६/८३०८९५६२३६/७६२०५६०१२५/८६०५६५४०२५ वर तसेच rirerirelkssrdsarlश्र.लेा या ईमेलवर संपर्क साधता येणार आहे.

पुण्यातील वैशाली आणि रुपाली हॉटेलचे परवाने निलंबित, तुकाराम मुंढेंच्या एफडीएची धडक कारवाई

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



पुणे – गेल्या काही महिन्यांपासून अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेल्या कारवाईमुळे हॉटेल चालकांचे धाबे दणाणले आहेत.

मुंबई पुण्यासह अनेक शहरातील मोठ मोठ्या आणि नामांकित हॉटेल्सवरती एफडीएने कारवाई केली आहे. सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी अन्न व औषध प्रशासनाने पुणे विभागांतर्गत शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रोड येथील दोन प्रसिद्ध हॉटेलांवरती कठोर कारवाई केली आहे.

तपासणीदरम्यान अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे गंभीर उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने मेसर्स हॉटेल वैशाली आणि मेसर्स रूपाली रेस्टॉरंट यांचे अन्न व्यवसाय परवाने तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहेत. ९८ पैकी केवळ ५८ गुण अन्न सुरक्षा अधिकारी अजिंक्य सुभाष उमाप यांनी दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी मेसर्स हॉटेल वैशाली या आस्थापनेची सखोल तपासणी केली. या तपासणीत ९८ पैकी केवळ ५८ गुण प्राप्त झाल्याने आस्थापनेचा निकाल 'छेप-ऊेश्रिळरपलश' नोंदवला गेला. डरषश ऋेज्ञ डरषश चरहरीरिहींर या मोहिमेअंतर्गत एफ. सी. रोड, पुणे येथील 'मेसर्स हॉटेल वैशाली' आणि 'मेसर्स रूपाली रेस्टॉरंट' यांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी अन्न व औषध प्रशासनाने पुणे विभागांतर्गत शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रोड येथील दोन प्रसिद्ध आस्थापनांवर कठोर कारवाई केली आहे.

सतेज पाटलांसह बड्या संस्थाचालकांना सरकारचा दणका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नागपूर – गोकुळच्या निकालानंतर काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांच्यासह राज्यातल्या बड्या संस्थाचालकांना सरकार दणका देण्याच्या तयारीत आहे.

संस्थाचालकांच्या मनमानी नफेखोरीवर सरकार अंकुश आणणार आहे. एफआरए कायदा आणून सरकार शैक्षणिक संस्थांची फी ठरवणार आहे. सरकारच्या या पावलामुळं शैक्षणिक शुल्क कमी होण्यास मदतच होईल. एबीपी माझाच्या विशेष कॉफी विथ कौशिक या पॉडकास्टमध्ये उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही घोषणा केली.एफआरए कायद्याअंतर्गत राज्य सरकार कोणत्या विद्यापीठांवर नियंत्रण ठेवू शकते, नव्या कायद्यात बदल केल्याने नेमका काय फायदा होणार?, याबाबत माहिती समोर आली आहे. २०१५ साली निर्माण झालेल्या एफआरए कायद्यानुसार राज्यातील कुठल्याही विद्यापीठाच्या महाविद्यालयाच्या 'फी' वसुलीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. मात्र मधल्या काळात खाजगी विद्यापीठ, अभिमत विद्यापीठ, क्लस्टर युनिव्हर्सिटी निर्माण झाल्याने या कायद्यात बदल करण्याची गरज निर्माण झाली.

राज्य सरकारच्या शुल्कनियमक प्राधिकरणाच्या कायद्याच्या चौकटीत शासकीय विद्यापीठ, अनुदानित महाविद्यालय, स्वायत्त महाविद्यालय येतात. या महाविद्यालयांच्या वि नियंत्रणात ठेवण्याच्या किंवा विवर झाली असेल तर या सगळ्या संदर्भात इन्स्पेक्शन करण्याचा भरमसाठ फी घेतली जात असेल तर कारवाई करण्याचा अधिकार एफ आर ए अंतर्गत राज्य सरकारला आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




अमरावती – भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती आज अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी विभागीय आयुक्त कार्यालयातील नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी नाझर आशिष अंबाडकर, सुरज पुनसे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

जळगावमध्ये भूकंपाचा धक्का! रावेर, भुसावळसह अनेक तालुके हादरले : हतनूर धरण परिसरातही हादरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



जळगाव – जळगाव जिल्ह्यात शनिवारी (दि.१४) सकाळी अचानक भूकंपाचे धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली. सकाळी सव्वानऊच्या सुमारास रावेर, भुसावळ, मुक्ताईनगर, चोपडा आणि यावलसह अनेक भागांत जमिनीला हादरे बसले. अचानक घरातील वस्तू हलू लागल्याने अनेक नागरिकांनी सुरक्षिततेसाठी घराबाहेर धाव घेतली. या भूकंपाची तीव्रता ४.५ इतकी नोंदवण्यात आली असून, त्याचा केंद्रबिंदू मध्य प्रदेशातील खरगोन परिसरात असल्याची माहिती समोर आली आहे. सुदैवाने, आतापर्यंत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचं वृत्त नाही.

सकाळी अचानक जमीन हादरली मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी नागरिक आपापल्या दैनंदिन कामात व्यस्त असताना अचानक जमिनीला हादरे जाणवू लागले. काही घरांमधील वस्तू हलल्याने नागरिक घाबरले आणि घराबाहेर पडले. काही वेळातच भूकंपाचे धक्के जाणवल्याची माहिती परिसरात पसरली. नागरिकांनी एकमेकांना फोन करून विचारपूस करण्यास सुरुवात केली. जळगाव जिल्ह्यातील रावेर, चोपडा, यावल, भुसावळ आणि मुक्ताईनगर परिसरात भूकंपाचे हादरे जाणवले. तसेच मध्य प्रदेशातील खंडवा, बऱ्हाणपूर आणि सेंधवा परिसरातही जमीन हादरल्याची माहिती आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू कुठे होता? समोर आलेल्या माहितीनुसार, भूकंपाचा केंद्रबिंदू महाराष्ट्रात नसून मध्य प्रदेशातील खरगोन परिसरात होता. या भूकंपाची तीव्रता ४.५ इतकी नोंदवण्यात आली असून, तो जमिनीखाली सुमारे १० किलोमीटर खोलीवर झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू महाराष्ट्राच्या सीमेजवळ असल्याने जळगाव जिल्ह्यातील अनेक भागांतही त्याचे हादरे जाणवले.

हतनूर धरण परिसरालाही हादरे

या भूकंपाचे धक्के हतनूर धरण परिसरातही जाणवले. माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, शनिवारी सकाळी सुमारे ९.१५ वाजता धरण परिसरातील चौकीला दोन ते तीन सेकंद हादरे जाणवले. यावेळी चौकी हादरल्याचं तेथील कर्मचाऱ्यांनी सांगितलं. मात्र, धरण परिसरातील भूकंप निरीक्षण यंत्रणा बंद असल्याने त्या ठिकाणी हादऱ्यांची नेमकी तीव्रता किती होती, हे समजू शकलेलं नाही. धरणाचं नुकसान झाल्याची कोणतीही पुष्टी झालेली नाही.

कुठे किती नुकसान झालं?

भूकंपाचे धक्के जाणवल्यानंतर स्थानिक प्रशासनाने परिस्थितीचा आढावा घेण्यास सुरुवात केली. विविध गावांमधून माहिती मागवण्यात आली असून, कुठे घरांचं किंवा इमारतींचं नुकसान झालं आहे का, याची पडताळणी केली जात आहे.

सुप्रिया सुळेंना डिलिमिटेशनला समर्थन करायचे असेल तर खुशाल करा, मात्र काँग्रेसचे नाव पुढे करु नये : विजय वडेट्टीवारांचा सूचक इशारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील काही लोक भाजपच्या ताटाखालचे मांजर झाली आहे. जेवढं उरलं असेल तेवढं खातात आणि डकार देतात. हे आता महाराष्ट्रातील जनतेपुढे लपून राहिलेलं नाही, मला त्यांची नाव घ्यायची गरज नाही. त्यामुळे त्यांच्यातील काही लोकांनी सत्तेबरोबर जावं, आपले पाप जे काही केले त्यावर पांघरून घालावं. यासाठी बेईमान झालेले लोक आहेत. महाराष्ट्राला लागलेली ही कीड आहे. या सगळ्यात आमची भूमिका वेट अँड वाचची आहे. देश विकणाऱ्यांच्या सोबत जर जात असेल तर जनता रस्त्यावर येऊन मतदानाच्या वेळी जागा दाखवेल. अशी प्रतिक्रिया देत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार दोन्हीं राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबातच्या चर्चेवर भाष्य करत प्रतिक्रिया दिली आहे.

सुप्रिया सुळेंना डिलिमिटेशनला समर्थन करायचे असेल तर त्यांनी खुशाल करावे. मात्र सुप्रिया सुळेंनी काँग्रेसचे नाव पुढे करू नये. आम्ही डिलिमिटेशन करताना फक्त आरक्षित मतदार संघ बदलले, वाढवले नाही किंवा सोईनुसार तुकडे केले नसल्याचे सांगत सुप्रिया सुळेंच्या डिलिमिटेशन संदर्भतील भूमिकेवरही काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार भाष्य करत प्रतिक्रिया दिली आहे.

आम्ही डिलिमिटेशन करताना फक्त आरक्षित मतदार संघ बदलले, वाढवले नाही किंवा सोईनुसार तुकडे केले नाही प्रिया सुळे यांची भूमिका त्यांचा मनाप्रमाणे होत असेल तर त्याला कोणाचा विरोध असणार आहे? मात्र डिलिमिटेशन करताना आसाममध्ये काय केलं, मतदारसंघाची फाळणी करताना जात-धर्म पाहून विरोधकांची पॉकेट्स पाहून उलट-सुलट मतदारसंघ निर्माण केले. म्हणून समर्थन असेल, तर त्यांचं समर्थन कुठल्या दृष्टीने आहे.

आमच्या पार्टी लेव्हलवर याबाबत चर्चा होईल. सुप्रियाताई समर्थन करायचं असेल तर करा. पण काँग्रेसच्या काळात डिलिमिटेशन झालं होतं ते स्पष्टपणे झालं होतं.

कशा पद्धतीने काँग्रेसने केलं ते सांगा, जागा लोकसंख्येने कमी जास्त झाल्या ते बदलल्या गेल्या, मतदारसंघाची जात-धर्म पाहून फाळणी केली नाही. मतदारसंघाचे सोयीचे मतदारसंघ बेइमानी करून निर्माण होऊ नये, त्याला आमचा विरोध असेल. असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

सत्तेसाठी काही भुकेले, त्यांना अन्नपानी गोड लागत नाही, मतदारांचा अनादर राष्ट्रवादी विलीनीकरण संदर्भात आमचा काही संबंध नाही. सत्तेसाठी काही भुकेले आहे. त्यांना अन्नपानी गोड लागत नाही. उपाशी पैशाशिवाय मारणारे आहे. सत्तेशीवाय अंगाची लाहीलाही होत आहे. त्यामुळे अंगाची खाज मिटवण्यासाठी चिखलात बसावे लागलीत आणि सत्तेत जाण्याची मानसिकता आहे.

काशिद समुद्रात एलईडी मासेमारी करणाऱ्या दोन नौका जप्त

मत्स्यव्यवसाय विभागाची धडक कारवाई

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



उरण – रायगड जिल्ह्याच्या सागरी हद्दीत अवैध मासेमारीला आळा घालण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने धडक कारवाई केली आहे.

काशिद समुद्रकिनाऱ्यासमोरील जलक्षेत्रात एलईडी दिव्यांच्या साहाय्याने मासेमारी करणाऱ्या दोन नौका विभागाच्या गस्ती पथकाने जप्त केल्या. ९ आणि १२ नोव्हेंबर रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत मोठ्या प्रमाणात एलईडी दिवे आणि जनरेटर हस्तगत करण्यात आले आहेत. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन प्रखर एलईडी दिव्यांच्या साहाय्याने अवैध मासेमारी सुरू असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय विभागाला मिळाली होती.

त्यानुसार गस्ती पथकाने समुद्रात सापळा रचून ही कारवाई केली. यामध्ये दिघी येथील नामदेव महादेव कावळे यांच्या मालकीची 'साईरत्न' (नोंदणी क्रमांक IND-MH-3-MM-4457) ही नौका, तसेच अलिबाग कोळीवाडा येथील हितेंद्र नरेश डबरी यांच्या मालकीची विनानोंदणीकृत नौका ताब्यात घेण्यात आली. 'साईरत्न' नौकेतून आठ एलईडी फोकस, तीन पाण्याखालील दिवे आणि एक जनरेटर जप्त करण्यात आला.

तर विनानोंदणीकृत नौकेतून १७ एलईडी फोकस, दोन पाण्याखालील दिवे, तीन सायन लाइट आणि एक जनरेटर असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. मत्स्यव्यवसाय आयुक्त, अतिरिक्त आयुक्त (योजना), सहआयुक्त आणि रायगड-अलिबागचे सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड-जंजिरा येथील सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी स्वप्निल दाभणे यांनी ही कारवाई केली.

सोन्याचे दर सलग चौथ्या दिवशी घसरले : तोळ्यामागे २५०० रुपयांची घट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – जागतिक बाजारातील कमकुवत संकेत आणि दिवाळीनंतर मागणीत आलेल्या घटीमुळे देशांतर्गत बाजारात सोन्याच्या दरातील घसरण सलग चौथ्या सत्रात कायम राहिली. शुक्रवारी दिल्लीत सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅममागे २,५०० रुपयांची मोठी घट झाली. ऑल इंडिया सराफा असोसिएशनच्या माहिती नुसार, ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा दर गुरुवारच्या १ लाख ४३ हजार ४०० रुपयांवरून घसरून १ लाख ४० हजार ९०० रुपये प्रति १० ग्रॅम झाला.

सुनेत्रा पवारांनी सांगितलं, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र नको

आता सुप्रिया सुळेंची पहिली प्रतिक्रिया, विलीनीकरणाचा विषय संपवून टाकला!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार की नाही, शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएसोबत जाणार का अशा चर्चांना राज्यात उधाण आलंय. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना दोन्ही पक्ष एकत्रित आलेलं नको आहे, अशी माहिती एबीपी माझाला विश्वसनीय सूत्रांनी दिलेली आहे.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र नको, अन्यथा भविष्यात आमच्या अस्तित्वातचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे आमची सध्या तरी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाला मान्यता नाही. मात्र दुसऱ्या राष्ट्रवादीबाबत आपण काही वेगळा विचार करत असाल किंवा दुसरी राष्ट्रवादी महायुतीचा स्वतंत्र घटकपक्ष म्हणून एनडीएमध्ये सहभागी होणार असेल तर याला आमचा विरोध नसेल, अशी देखील माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावतीने कळवण्यात आली असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. त्यामुळे विलीनीकरणात येत असलेल्या अडचणींचा विचार करता शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून विलीनीकरण ऐवजी स्वतंत्र पक्ष म्हणून सत्तेत जाण्याच्या पर्यायावर चर्चा सूत्रांची माहिती आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलीनीकरणाच्या चर्चा फेटाळून लावल्या.



सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१३९८०० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - १२८१५०रु.(१०ग्रॅम)

चांदी - २००००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	२६०० -	२८५०
गहू -	२६५० -	३०००
तूर -	१०००० -	१०७११
मूग -	७५०० -	८६५०
उडीद -	७८०० -	८५००
हरभरा -	६८०० -	७३००
सोयाबिन -	६८०० -	७१६१
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	१२००० -	१३०००
भुईमूग -	७२५० -	७४५०
मका -	२८०० -	२९००

ऑनलाईन डिलीव्हरी पार्सल संबंधाने एपीके फाईल पाठवुन

जरुडात लाख ६८ हजार २९४ रुपयांची आर्थिक फसवणुक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – ऑनलाईन डिलीव्हरी पार्सल संबंधाने एपीके फाईल पाठवुन १० दिवसांत तब्बल २ लाख ६८ हजार २९४ रुपयांची आर्थिक फसवणुक केल्याची घटना जरुड येथे घडली. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी दोन अज्ञात भामटयांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

हकिकत अशा प्रकारे आहे की, ३० ऑक्टोबर २०२६ ते ७ नोव्हेंबर २०२६ दरम्यान




फिर्यादी माया रमेश वैश्य (३८) रा.जरुड यांची ऑनलाईन डिलीव्हरी पार्सल संबंधाने नमुद अज्ञात भामट्यांनी फिर्यादीचे व्हाटसअप नंबरवर मोबाईल क्रमांक ९३९४२०८२४५ वरुन २ एपीके फाईल पाठवले.

नमुद फिर्यादीने पार्सल डिलिव्हरी प्राप्त करण्याचा करुन अनवधानाने दोन्ही एपिके फाईलवर क्लिक करून त्यावर त्याचे पुर्ण नाव मोबाईल नंबर अशी माहिती भरली त्यानंतर नमुद अज्ञात इसमांनी फिर्यादीस म्हटले की, 'आप इस नंबर पे फोन पे पर दो रुपये कंप्लेंट चार्ज किजिए', असे म्हटल्याने फिर्यादीस यांनी दोन रुपये त्याचे फोन पे वरुन पेड केले असता ३० ऑक्टोबर २०२६ ते ७ नोव्हेंबर २०२६ दरम्यान त्यांचे अकाऊंट मधुन १० व्यवहार होऊन एकुण २ लाख ६८ हजार २९४ रुपयांची दोन अनओळखी ईसमांनी आर्थीक फसवणुक केली, याबाबत एनसीआरबी या सायबर पोर्टलवर ऑनलाईन तक्रार दिली त्यानुसार वरुड पोलिसांनी दोन अनोळखी ईसमाविरुध्द कलम ३१८ (४), ३१९(२), ३ (५) भा.न्या.सं.२०२३, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, ६६ (ई), ६६ (ड) २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

मोदी माझा फोन टॅप करतात... : राहुल गांधी यांचा खळबळजनक आरोप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला फोन टॅप करत असल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी केल्याने खळबळ माजली आहे. इन्स्टाग्रामवरील एका प्रश्नोत्तराच्या सत्रात राहुल गांधी यांनी मोदींना समोरासमोर चर्चेचे खुले आव्हान दिले. माझ्या फोनमध्ये पंतप्रधानांविरोधातील सर्व आरोपांचे पुरावे असून, ते माझा



फोन टॅप करत असल्याचा दावा गांधी यांनी केला. मोदी यांनी आपल्यासोबत समोरासमोर चर्चा केली तर त्यांची राजकीय कारकीर्द संपुष्टात येईल आणि ते पंतप्रधानपदी राहणार नाहीत, असा दावाही त्यांनी केला.

दिल्लीत सुप्रिया सुळे-प्रफुल पटेलांची बैठक

राष्ट्रवादीतील विलीनीकरणाच्या चर्चेला गती, सूत्रांची माहिती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – राज्याच्या राजकारणात दिवाळीनंतर मोठा भूकंप पाहायला मिळण्याची शक्यता राजकीय वतुर्ळातून वर्तवली जात आहे. कारण, दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा सुरू असून आता राष्ट्रवादीचे नेतेही या चर्चेवर सकारात्मक प्रतिक्रिया देताना दिसून येतात. त्यानंतर, आज राजधानी दिल्लीत दोन्ही राष्ट्रवादीच्या



वरिष्ठ नेत्यांची दिल्लीत बैठक झाल्याची सूत्रांची माहिती आहे. राज्यात दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या हालचाली गतीमान असल्याचं दिसून येत आहे. कारण, आधी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, त्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांनीही अजित पवारांच्या हयातीतच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा झाली होती, जयंत पाटील आणि अजित पवारांची भेट झाल्यानंतर हा विषय चर्चेत होता, असे भुजबळ यांनी म्हटले.

एमपीएससी पेपरफुटीसंदर्भात तक्रार, निवेदनं करण्यास मुदतवाढ : दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे चौकशी समितीचा निर्णय



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्यात गेल्या काही महिन्यात झालेल्या पेपरफुटीवरुन विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट दिसून आली. विशेष म्हणजे, एमपीएससी सारख्या अतिमहत्त्वाच्या परीक्षेतही घोटाळा झाल्याचं उघडकीस आल्यानंतर संबंधित परीक्षांची, गैरप्रकाराची चौकशी करण्याची मागणी एमपीएससी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून करण्यात आली. त्याच, अनुषंगाने पुण्यात आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात मोठं आंदोलन देखील उभारण्यात आलं. अखेर, सरकारने निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे. त्यातच, आता पेपरफुटीसंदर्भात विद्यार्थ्यांना तक्रारी, निवेदनं करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या चौकशी समितीत सनदी अधिकारी तुकाराम मुंडेंचाही सहभाग करण्यात आला आहे.

३ दिवसांपासून गायब, चौथ्या दिवशी खड्ड्यात दुचाहीसह तरुणाचा आढळला मृतदेह : जळगावमध्ये खळबळ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

जळगाव – जळगाव तालुक्यातील आसोदा-भोलाणे रस्त्यावर एका ३८ वर्षीय तरुणाचा मृतदेह दुचाकीसह खड्ड्यात आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. गलू देवीदास कोळी असे मृत तरुणाचे नाव असून, त्यांच्या मृत्यूबाबत कुटुंबीयांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे.

गलू कोळी हे १० नोव्हेंबरपासून घरातून बेपत्ता होते. अखेर शुक्रवारी १३ नोव्हेंबर रोजी सकाळी आसोदा-भोलाणे रस्त्यावरील शेताकडे जाणाऱ्या मार्गावरील



खड्ड्यात त्यांचा मृतदेह दुचाकीसह आढळून आला. मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेण्यात आला. तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृत्यूचे गूढ उकलण्याचे पोलिसांसमोर आव्हान- माझ्या भावाचा तीन ते चार जणांनी मिळून घातपात केला असावा, असा आरोप मृताचे भाऊ मनोज कोळी यांनी केला आहे. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, मृत्यूचे गूढ उकलण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. धाराशिव च्या येवतीमध्येही धक्कादायक घटना- मोबाईल घेण्यासाठी पैसे न दिल्याच्या रागातून मुलानेच जन्मदात्या वडिलांच्या डोक्यात लोखंडी फुकारीने वार करून खून केल्याची धक्कादायक घटना तुळजापूर तालुक्यातील येवती येथे घडली.





